**प्रेस नोट** दिनांक २२/०२/२०२५

०१.मुंजा नामदेवराव मोहिते, वय २९ वर्ष, व्यवसाय शेती व रेडियमध्यीयूसी सेंटर चालक , रा.खानापूर नगर, परभणी (खाजगी इसम) ०२.संतोष नंदकुमार डुकरे, वय ४३ वर्ष,पद मोटार वाहन निरीक्षक, नेमणूक उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी रा.१०१, हरिप्रिया रेसिडेन्सी, शुक्रवार पेठ, कोल्हापूर (वर्ग १) हे ५००/- रुपयांची लाचमागणी व स्विकारले प्रकरणी अेसीबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट अहिल्यानगर |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे.ताडकळस गुरनं ३४/२०२५ कलम ७ अ, १२ भ्र.प्र.अधि १९८८ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | ०१.मुंजा नामदेवराव मोहिते, वय २९ वर्ष, व्यवसाय शेती व रेडियमध्यीयूसी सेंटर चालक , रा.खानापूर नगर, परभणी (खाजगी इसम)<br>०२.संतोष नंदकुमार डुकरे, वय ४३ वर्ष,पद मोटार वाहन निरीक्षक, नेमणूक उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी रा.१०१, हरिप्रिया रेसिडेन्सी, शुक्रवार पेठ, कोल्हापूर (वर्ग १) परिवहन (गृह) विभाग |
| स्विकारलेली लाच रक्कम | ५००/- रु |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी दोन महिन्यापूर्वी खरेदी केलेल्या ऑटो रिक्षा पासिंग कालावधी ( फिटनेस सर्टिफिकेट ) संपलेला असल्याने ती पासिंग ( फिटनेस सर्टिफिकेट रिनिवल ) करण्यासाठी शासकीय फी भरलेली होती. दि.२०/०२/२०२५ रोजी तक्रारदार आलोसे डुकरे यांना पासिंगचे कामासाठी भेटले असता त्यांनी मुंजा मोहिते यांना भेटण्यास सांगितले. मुंजा मोहिते याने तक्रारदार यांना पासिंगचे काम करून देतो त्यासाठी डुकरे साहेब यांना ५०० रु द्यावे लागतील असे सांगितले. सदर रक्कम ही लाच असल्याने तक्रारदार यांनी अहिल्यानगर ला.प्र.वि यांचेकडे कारवाई करिता संपर्क केला.

दिनांक २१/०२/२०२५ रोजी सापळा अधिकारी यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी येथे केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक डुकरे यांनी पंचांसमक्ष इशाऱ्याद्वारे तक्रारदार यांना त्यांचे ऑटो रिक्षा पासिंग कामाकरीता मुंजा मोहिते यांना भेटण्यास सांगून त्याचेकरवी लाचेची मागणी करण्यास मुंजा मोहिते यांना प्रोत्साहन दिले. त्यावरुन तक्रारदार हे मुंजा मोहिते यांना भेटले असता त्याने पंचासमक्ष तक्रारदार यांचे ऑटो रिक्षा पासिंग कामासाठी लोकसेवक डुकरे यांच्याकरिता ५०० रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये मुंजा मोहिते याने लोकसेवक डुकरे यांचेकरिता पंचांसमक्ष तक्रारदार यांचे कडून ५०० रु लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले. लोकसेवक डुकरे यांना देखील ताब्यात घेण्यात आले असून दोघांचे विरुद्ध पो.स्टे.ताडकळस येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही मा. श्रीमती.शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नाशिक परिक्षेत्र,नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती. छाया देवरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि अहिल्यानगर यांनी पार पाडली. |
| तपास अधिकारी | श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| **दुरध्वनी क्रमांक** :- 02452220597 **टोल फ्री क्रमांक**:- 1064 **ऑनलाईन ॲप** acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| **WhatsApp No. 9272111064** | |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो पोलीस परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with CamScanner